# टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे-३७

जा.क्र. : प्रशा/व्य.मं./२०१६/ १३/०६/२०१६

## कार्यवृत्तांत

विद्यापीठाच्या व्यवस्थापन मंडळाची तातडीची सभा शुक्रवार दि. १० जून २०१६ रोजी दुपारी ३.०० वाजता विद्यापीठ भवन, गुलटेकडी, पुणे-३७ येथे आयोजित करण्यात आली होती. त्यावेळी खालील सदस्य उपस्थित होते:-

१. डॉ. दिपक ज. टिळक, कुलगुरू (अध्यक्ष)
२. डॉ. गीताली हृषिकेश मोने-टिळक, अधिष्ठाता, आधुनिकशास्त्रे आणि व्यावसायिक कौशल्ये अभ्यासमंडळ
३. डॉ. मा. चिं. दिक्षित, मा. कुलपती नामनिर्देशित शैक्षणिक तज्ञ
४. डॉ. श्री. ग. बापट, मा. कुलपती नामनिर्देशित शैक्षणिक तज्ञ
५. मा. शिक्षक सहसंचालक, उच्चशिक्षण अनुदान, पुणे (निमंत्रित)
६. डॉ. श्रीपाद भट, प्राध्यापक प्रतिनिधी
७. डॉ. माधवी रेणावीकर, सहयोगी प्राध्यापक प्रतिनिधी
८. सौ. प्रणति टिळक, विश्वस्त मंडळ प्रतिनिधी
९. डॉ. अभिजीत जोशी, प्रभारी कुलसचिव (सचिव)
१०. डॉ. बा. शि. दामले, अधिष्ठाता, आरोग्यशास्त्र अभ्यासमंडळ

डॉ. स.प्र.सरदेशमुख, डॉ.हेमंत अभ्यंकर व श्रीमती सरीता साठे यांनी सभेस उपस्थित राहू शकणार नसल्याचे कळविले.

१) व्यवस्थापन मंडळाची मागील सभा दि. २६ एप्रिल २०१६ रोजी झाली. त्या सभेचा कार्यवृत्तांत संमत करणे व केलेल्या कार्यवाहीची नोंद घेणे. (कार्यवृत्तांत प्रत जा. क्र.प्रशा/व्य.मं./२०१६/२५७ दि. २७ एप्रिल २०१६ अन्वये पाठविली आहे. केलेल्या कार्यवाहीचा अहवाल सोबत जोडला आहे.)

**ठराव : व्य.मं.२०१६-१२९**
कार्यवृत्तांत संमत करण्यात येत असून केलेल्या कार्यवाहीची नोंद घेतली.

२) श्री. पार्थ भास्कर बापट यांचा दि. ११ मे २०१६ चा विनंती अर्ज विचारार्थ.
(श्री. बापट हे बी.एस्सी. पदवीधारक असून मे २०१५ मध्ये एम.ए./एम.एस्सी. भूगोल अभ्यासक्रमाच्या परीक्षेत त्यांना ए+ श्रेणी प्राप्त झाली असल्याने त्यांना दिलेल्या पदवीपत्रकावर भूगोल विषयातील एम्.ए. पदवी ऐवजी एम.एस्सी. पदवी असा बदल करुन नवीन पदवीपत्रक मिळावे अशी विनंती केली आहे.)

**ठराव : व्य.मं.२०१६-१३०**
विनंतीस मान्यता देण्यात आली.

३) विद्यापीठातील प्रशासन अधिकारी यांनी दि. ९ मे २०१६ रोजी सादर केलेले विद्यापीठ कर्मचाऱ्यांच्या सेवापुस्तकातील त्रुटीसंदर्भांतील कार्यालयीन टिपण विचारार्थ.
(सदरच्या कार्यालयीन टिपणीमध्ये, माहे एप्रिल २०१६ मध्ये विद्यापीठ कर्मचाऱ्यांच्या सेवापुस्तकातील नोंदींचा आढावा घेतला असता नोंदींचे काम पूर्ण करण्याच्यादृष्टीने तफावती तसेच त्रुटी आढळून असल्याचे नमूद केले आहे.)

**ठराव : व्य.मं.२०१६-१३१**
**सर्व अपूर्ण सेवापुस्तके प्रभारी कुलसचिव यांनी लवकरात लवकर अद्ययावत करून घ्यावी.**

४) विद्यापीठातील कनिष्ठ लिपीक सौ. पल्लवी मल्हार जोशी यांचा दोन वर्षाचा परिविक्षा कालावधी संपला असल्याने त्यांना विद्यापीठ सेवेत कायम करणेबाबत विचार.
(सदरच्या विषयाबाबत व्यवस्थापन मंडळाच्या दि. २१ मार्च २०१६ च्या सभेत (ठराव क्र. व्य.मं.२०१६-९७ अन्वये) प्रभारी कुलसचिवांनी पुढील कार्यवाही करावी असा ठराव करण्यात आलेला आहे.)

**ठराव : व्य.मं.२०१६-१३२**
विद्यापीठातील कनिष्ठ लिपीक सौ. पल्लवी मल्हार जोशी **यांचा गोपनीय अहवाल विचारात घेऊन त्यांना विद्यापीठ सेवेत कायम करण्यात यावे.**

५) ड्युअल डिग्री प्रमाणपत्र देणेबाबत विचार.
(विद्यापीठाचा दोन प्राविण्य विषयासह व्यवस्थापन अभ्यासक्रम पूर्ण केलेली विद्यार्थीनी श्रीमती शमा मुल्ला हिने यासंदर्भात विनंती अर्ज सादर केला आहे.)

**ठराव : व्य.मं.२०१६-१३३**
**सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या ड्युअल डिग्री प्रमाणपत्र देण्याबाबतच्या नियमावलीचा अभ्यास करून पुढील कार्यवाही मा. कुलगुरू यांच्या आदेशानंतर करण्यात यावी.**

६) नॅशनल नॉलेज नेटवर्क कनेक्टीव्हीटी करीता येणाऱ्या अंदाजे रु. १७ लाख खर्चास मान्यता देण्याबाबत विचार.
(मानव संसाधन विकास मंत्रालय, उच्चशिक्षण विभाग, भारत सरकार, नवी दिल्ली यांच्या दि. २७ मे २०१६ च्या पत्रान्वये नॅशनल नॉलेज नेटवर्क कनेक्टीव्हीटी (१ जीबीपीएस) करीता विद्यापीठाची निवड झाली असून त्याकरीता ७५ टक्के (अंदाजे ६७ लाख रुपये) मानव संसाधन विकास मंत्रालय देणार आहे व उर्वरित २५ टक्के (अंदाजे १७ लाख रुपये) विद्यापीठाने करावयाचा आहे असे सूचित केले आहे.)

**ठराव : व्य.मं.२०१६-१३४**
प्रस्तावास मंजूरी देण्यात आली.

७) बी.ए. सामाजिकशास्त्रे / योग अभ्यासक्रमाच्या द्वितीय वर्षास सरळ प्रवेश देण्याबाबत दूरशिक्षण विभागाने दि. २ जून २०१६ रोजी सादर केलेला प्रस्ताव विचारार्थ.

**ठराव : व्य.मं.२०१६-१३५**
प्रस्तावास मंजूरी देण्यात आली.

८) जपानी भाषा विभागाच्या शैक्षणिक वर्ष २०१६-१७ च्या वेळापत्रकास मान्यता देणेबाबत विचार.
(जपानी भाषा विभागाने दि. ८ जून २०१६ अन्वये शैक्षणिक वर्ष २०१६-१७ साठीचे वेळापत्रक मान्यतेसाठी सादर केले आहे.)

**ठराव : व्य.मं.२०१६-१३६**
जपानी भाषा विभागाच्या शैक्षणिक वर्ष २०१६-१७ च्या वेळापत्रकास मान्यता देण्यात आली.

९) विद्यापीठातील सहयोगी प्राध्यापक डॉ. माधवी रेणावीकर यांच्या वेतन निश्चितीबाबत विचार.

**ठराव : व्य.मं.२०१६-१३७**
डॉ. माधवी रेणावीकर यांची Ph.D. अर्हता लक्षात घेऊन त्यांनी जेव्हापासून ही अर्हता प्राप्त केली तेव्हापासून Ph.D. बाबत जादा वेतनवाढ, शासननिर्णयानुसार जशीच्या तशी त्यांना लागू करण्यात यावी.

१०) विद्यापीठाच्या अन्य अधिकार मंडळाप्रमाणे परीक्षा मंडळाचे गठन करण्याबाबत विचार.

**ठराव : व्य.मं.२०१६-१३८**
इतर विद्यापीठांप्रमाणे आपल्या विद्यापीठात स्वतंत्र परीक्षा मंडळ (बोर्ड ऑफ एक्झामिनेशन) गठीत करण्यास मान्यता देण्यात येत आहे. या मंडळाचा कार्यकाळ विद्यापीठाच्या अधिनियमांनुसार राहील. परीक्षांचे नियोजन, त्यात येणाऱ्या अडचणी व तक्रारी यांचा पूर्ण विचार करण्यासाठी सदर मंडळ कार्यबध्द राहील. या मंडळाची संरचना खालीलप्रमाणे करण्यात येत आहे.

- मा. कुलगुरु, पदसिध्द अध्यक्ष
- सौ. प्रणति रोहित टिळक, समन्वयक
- सौ. सुनिता दिघे, सदस्य
- सौ. सुवर्णा साठे, सदस्य
- सौ. निलीमा कुलकर्णी, सदस्य
- सौ. सुनंदा यादव )
- श्री. योगेश लांडगे )
- श्री. ऋषिकेश केळकर ) निमंत्रित सदस्य (आवश्यकतेनुसार)
- श्री. अमित आगाशे )

११) विद्यापीठात बहि:स्थ विभाग सुरु करण्याबाबत विचार.
(दूरशिक्षण विभागाने यासंदर्भात दि. ९ जून २०१६ रोजीच्या पत्रान्वये प्रस्ताव सादर केला आहे.)

**ठराव : व्य.मं.२०१६-१३९**
प्रस्तावास मान्यता देण्यात आली.

१२) श्री. उमेश केसकर यांचेकडून प्राप्त झालेल्या पत्रांवर पुढील निर्णय घेण्याबाबत विचार.

**ठराव : व्य.मं.२०१६-१४०**
मा.कुलपती यांच्या आदेश व मार्गदर्शनान्वये पुढील कार्यवाही करण्यात यावी.

१३) सौ. स्वाती बेल्हे यांचे दि. ६ जून २०१६ चे पत्रावर पुढील निर्णय घेण्याबाबत विचार.

**ठराव : व्य.मं.२०१६-१४१**
शासन नामनिर्देशित सदस्याने निलंबनाशिवाय चौकशी करण्याचा प्रस्ताव ठेवला. परंतु बहुमताने इतर सदस्यांच्या सूचनांनुसार खालील ठराव मान्य करण्यात आला.

अ) सौ. स्वाती बेल्हे यांना प्रलंबित विभागीय चौकशीसाठी कायद्यातील तरतूदींनुसार तत्काळ निलंबित करण्यात यावे.
ब) MCSR च्या तरतूदींनुसार विभागीय चौकशी सुरू करण्यात यावी व त्यांच्यावर आरोपपत्र दाखल

करण्यात यावे.

क) त्यांच्या निलंबन पत्राची प्रत संबंधित सरकारी विभागाकडे योग्य त्या कार्यवाहीसाठी पाठविण्यात यावी.

१४) विद्यापीठातील लघुलेखक सौ. वीणा कुलकर्णी यांच्याकडून प्राप्त झालेल्या पत्रांवर पुढील निर्णय घेण्याबाबत विचार.

ठराव : व्य.मं.२०१६-१४२

शासन नामनिर्देशित सदस्याने निलंबनाशिवाय चौकशी करण्याचा प्रस्ताव ठेवला. परंतु बहुमताने इतर सदस्यांच्या सूचनांनुसार खालील ठराव मान्य करण्यात आला.

अ) सौ. वीणा कुलकर्णी यांना प्रलंबित विभागीय चौकशीसाठी कायद्यातील तरतूदींनुसार तत्काळ निलंबित करण्यात यावे.

ब) MCSR च्या तरतूदींनुसार विभागीय चौकशी सुरू करण्यात यावी व त्यांच्यावर आरोपपत्र दाखल करण्यात यावे.

क) त्यांच्या निलंबन पत्राची प्रत संबंधित सरकारी विभागाकडे योग्य त्या कार्यवाहीसाठी पाठविण्यात यावी.

सही : डॉ. अभिजीत जोशी
प्रभारी कुलसचिव

सही : डॉ. दीपक ज. टिळक
अध्यक्ष